# प्रेसनोट

## मोटार वाहन अपघातील प्रत्यक्षदर्शी किंवा साक्षिदारांना त्रास होवू नये याकरीता पोलीस अधिक्षकांचे आदेश

एखादा मोटार वाहन अपघात घडुन आल्यास,त्याठिकाणी हजर असणारे व्यक्ती किंवा प्रत्यक्ष साक्षिदार हे पोलीसांच्या चौकशीच्या ससेमिरा मागे लागेल किंवा कोर्टाच्या फे–या माराव्या लागतील या समजुतीने किंवा भितीने मोटर वाहन अपघातातील व्यक्तीना मदत करण्यास किंवा पोलीसांना माहिती देण्यात धजावत नाहीत.परिणामी अपघातातील जखमीना वेळींच वैदयकीय उपचार उपलब्ध होत नाहीत.मोटर वाहन अपघातात जखमी झालेल्या जखमीकरीता सुरुवातीचा १ तास (Golden Hour ) हा अतिशय महत्वाचा असतो. याकालावधीत वैदयकीय मदत वेळीच उपलब्ध झाल्यास त्याचे प्राण वाचु शकतात. हिच बाब विचारत घेवून मा. पोलीस अधिक्षक विनीता साहु याबाबत केंद्रसरकारने जारी केलेले अधिसुचना क्रमांक २५०३५/ १०१ /२०१४– आर एस दिनांक १२/५/२०१५ नुसार ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांना दिलेले आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांनाही याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना पोलीसांना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार – १) मोटार वाहन अपघतातील जखमीस जर कोणीही व्यक्ती किंवा प्रत्यक्ष साक्षीदार हे जवळच्या हॉस्पीटलमध्ये उपचाराकरीता दाखल करतील तेव्हा अशा व्यक्तिस कोणतेही उलट सुलट प्रश्न विचारण्यात येणार नाहीत व त्यांना तात्काळ जावु देण्यात येईल.

२) जर कोणत्याही मोटार वाहन अपघाताची माहिती कोणीही त्रयस्थ व्यक्तीने/नागरीकांनी फोनवरुन किंवा प्रत्यक्ष दिल्यास त्याची ओळख गुप्त ठेवली जाईल. त्याची ओळख उघड करण्याकरीता त्यांचेवर कोणताही दबाव पोलींसाकडून आणला जाणार नाही.

३) जर अशी व्यक्ती ही स्वत:हुन मोटार वाहन अपघातातील प्रत्यक्ष साक्षीदार असल्याचे सांगत असेल व स्वत:हुन साक्षीदार बनण्यास तयार असेल तर आणि केवळ तरच अशा व्यक्तीचा जबाब साक्षीदार म्हणुन नोंदविण्यात येईल.

अशी व्यक्ती जबाब नोदविण्यास राजी नसेल तर तिचेवर पोलीसाकडून दबाव आणला जाणार नाही. जबाब नोंदविण्यात राजी असलेले व्यक्तीस पोलीस तपासाकरीता किंवा कोर्टात साक्षीकरीता बोलवावयाचे असल्यास केवळ एकच वेळ बोलविण्यात येईल. त्यास कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल व त्याचे सोयीनुसार व्हिडीओ कॉन्फरसींग व्द्‌ारे त्याची साक्ष नोदविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

४) मोटार वाहन अपघाताची माहिती देणा—या अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा साक्षिदारास कोणत्याही शासकीय कर्मचा—याने जाणीवपुर्वक त्रास दिल्यास अशा कर्मचा—यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल किंवा त्याची विभागीय चौकशी करण्यात येईल.

५) मोटार वाहन अपघातातील जखमीना आवश्यक ती मदत करणा—या नागरीकांच्या मदतीची दखल जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात येईल व अशा नागरीकांचा यथोचित आदर सत्कार करण्यात येईल.

त्यामुळे यापुढे कोणत्याही मोटार वाहन अपघातातील प्रत्यक्ष साक्षिदाराने मनामध्ये कोणतीही भिती न बाळगता अपघातातील जखमीना त्याचेपरीने योग्य ती मदत करावी व पोलीसांना दुरध्वनी क्रमांक १०० वर तात्काळ माहिती देवून पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधिक्षक, विनीता साहु यांनी सर्व सामान्य जनतेला केलेले आहे.

(बी.आर.गाडे)
पोलीस निरीक्षक
जिल्हा वाहतुक नियंत्रण अधिकारी
भंडारा